# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषी नगर, अकोला - ४४४ १०४

**वाचा:** १) जाहिरात क्र. पंदेकृवि/आस्था/ जाहिरात/२०१६ (०१), दि. १४ डिसेंबर, २०१६
२) जाहिरात क्र. बीएमसी/जाहिरात/०१/२०१६ दि. २९ डिसेंबर, २०१६

## कागदपत्र पडताळणी बाबत सुचना

**जा.क्र.बीइए/ जाहिरात/२०१६** **दिनांक १८ ऑगस्ट, २०१८**

डॉ. पं.दे.कृ.वी. अकोला अंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व कुशल मदतनीस संवर्गांतील रिक्त पदे भरण्यासाठी साठी दि. १२.०८.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेत प्राप्त गुणांची यादी विद्यापीठाचे संकेतस्थळावर दिनांक १४.०८.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार लेखी परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे, जाहीरातीमधे नमुद रिक्त पदसंख्या लक्षात घेवून पर्याप्त संख्येत उमेदवारांना गुणानुक्रमे कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी बोलाविण्यात येत आहे. अशा उमेदवारांची यादी विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर प्रसिध्द करण्यात येत असून सदर उमेदवारांनी खालील नमुद नुसार सकाळी १०.०० वाजता हजर होणे आवश्यक आहे.

| अक्र | पदाचे नांव | दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | सोमवार २७.०८.२०१८ सकाळी १०.०० वाजता | स्व.डॉ. के.आर. ठाकरे सभागृह, कृषि महाविद्यालय, मुर्तीजापूर रोड कृषिनगर, अकोला |
| २ | कुशल मदतनीस | सोमवार २७.०८.२०१८ सकाळी ११.०० वाजता | |

संबंधीत उमेदवारांनी लेखी परिक्षचे प्रवेशपत्र व फोटो ओळखपत्र तसेच अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व छायांकीत प्रतींचा एक संचासह कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बोलाविण्यात आलेल्या नियोजीत दिवशी वेळेवर उपस्थित रहावे. जे उमेदवार नियोजीत वेळ व दिनांकास उपस्थित होणार नाही अथवा जे उमेदवार नमुद केलेली कागदपत्रे पुरविण्यास असमर्थ ठरतील असे उमेदवार गुणवत्ता यादीत जरी अग्रस्थानी असले तरी त्यांची उमेदवारी ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच नंतर त्याविषयी कुठल्याही प्रकारची तक्रार/विनंती मान्य करण्यात येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांना केवळ कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आले म्हणून त्यांनी निवड झाली असे समजण्यात येवू नये. कागदपत्र पडताळणी नंतर कागदपत्रांची पुर्तता करणा-या उमेदवारांची जाहिरात केलेल्या रिक्त पदांवर प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार मुलाखती शिवाय निवड समितीच्या मान्यतेने निवड करण्यात येणार आहे.

स्वा/-
कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला